Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – II August 2015

# पुणे जिल्हयातील सहकारी चळवळ

प्रा. सोपान घोळवे,
चाकण शिक्षण मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय,
चाकण, ता. खेड, ज़ि पुणे

पुणे जिल्हा हा दीर्घकाळ काँग्रेसमधील मराठा धुरीणात्वाचा व सहकाराचा बालेकिल्ला राहिला आहे. सहकारी साखर कारखाने, सह सोसायटया, पतसंस्था, सह बँका, दूध संस्था इ. च्या माध्यमातून सहकाराचे राजकारण पुणे जिल्हयात चालते. हे काम विषेषत्वाने ग्रामीण भागात चालते. ग्रामीण भागाच्या अर्थव्यवस्था ही यावर अवलंबून आहे. सहकारातून मिळणारा पैसा हा शेतकऱ्यांच्या खिश्यात जातो.

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या पदाधिकाऱ्यापेक्षा सहकारी संस्थाच्या पदाधिकाऱ्यांना जिल्हयाच्या राजकारणात जास्त महत्त्व आहे. दीर्घकाळापासून राज्याचे राजकारण पुणे जिल्हयातून सत्ताधारी म्हणून चालू असलेले आपणास पहावयास मिळते. सत्ता ही ग्रामीण भागाकडेच असलेली पहावयास मिळते याचे एकमेव कारण म्हणजे सहकार क्षेत्रात ग्रामीण भागातील नेत्यांनी केलेली प्रगती हे होय.

सहकारामध्ये शरद पवार, अनंतराव थोपटे, शंकरराव पाटील, मुगुटराव काकडे, दिलिप वळसे, निवृत्ती शेरकर, विदूरा नवले, सुभाष कुल, रमेश थोरात, अशोक पवार इ. मातब्बर घराण्यांनी दीर्घकाळापासून काम सुरू ठेवलेले आहे. त्यातील काही घराणी शरद पवार समर्थक तर काही विरोधी गटातील आहेत. परंतू ज्या त्या घराण्यांने आपआपला बालेकिल्ला सांभाळून ठेवलेला आहे.

अलिकडच्या काळात माध्यमनिती यशस्वी करण्यासाठी अर्थनितीचा वापर होऊ लागला आहे. हे धोरण सहकारात काम करणाऱ्या नेत्यांना तितकेसे यशस्वी आजपर्यंत करता आलेले नाही. परंतू अलिकडे या माध्यमनीतीचा उपयोग करूनच भाजपाच्या जास्त जागा पुणे शहर व काही प्रमाणात ग्रामीण भागात आलेल्या दिसतात. ग्रामीण भागात भाजपापेक्षा राश्ट्रवादी काँग्रेसनंतर शिवसेनेचा वरचष्मा असलेला पहावयास मिळतो. परंतू सहकार क्षेत्रामध्ये शिवसेना – भाजपाचा शिरकाव न होवू देण्याचे काँग्रेस व राष्ट्रवादीचे धोरण उघडपणे पहावयास मिळते.

सहकार हा ग्रामीण राजकारणाचा कणा आजही आहे. परंतू अलिकडे सहकार क्षेत्रामध्ये सहकारी साखर कारखाने स्वतःच्या मालकीचे असावेत असे स्वतः नेत्यांनाच वाटू लागल्याने त्यांनी ते सुरू करून दाखविले आहे. सहकारी साखर कारखाना जर खाजगी साखर कारखान्याच्या जवळ असेल तर सहकारी साखर कारखाना मोडीत निघाला तरी चालेल असे खाजगीत ते बोलत आहेत. यावरून त्यांची स्वार्थी प्रवृत्ती आपल्या लक्षात येते.

सहकार क्षेत्र हे आजही काँग्रेस व राष्ट्रवादीच्या ताब्यात आहे त्यासाठी पक्षीय पातळीवरचा समर्थ पर्याय भाजपा – सेना देऊ शकत नाहीत ही वस्तूस्थिती आहे. सहकारी साखर कारखाने ऊसाला जास्तीत जास्त भार देण्यामध्ये कुचराई करताना आपणास पहावयास मिळतात. वसंतदादा शुगर इन्स्टीटयूट मांजरी बु।। सारखी संस्था पुणे जिल्हयात आहे.ऊसाचे नवीन बियाणे, पीक पद्धती, पाणी देण्याची पद्धती (ठिबक), पट्टा पद्धत

इ. गोष्टी संबंधी नवे संशोधन या संस्थेत चालते परंतू शेतकऱ्यांपर्यंत हे पोहचत नाही. हे संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्याची यंत्रणा विकसित होणे गरजेचे आहे.

जिल्हा बँक, खरेदी – विक्री संघ, सूतगिरणी, शेत–माल प्रक्रिया संघ इ. च्या माध्यमातूनही सहकाराचे राजकारण चालू असलेले दिसते. बहुतांश राजकीय नेत्यांनी सहकारातून भ्रष्टाचाराच्या आधारे राजकारण करून विधानसभा किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमध्ये यश संपादन केलेले दिसते. आघाडी सरकारच्या काळातील 288 आमदारांपैकी 253 आमदार हे करोडपती होते हा केवळ योगायोग नाही तर सध्याचे सरकार हे सत्ताधारी सहकार सम्राटांना अडचणी आणण्यामध्ये मश्गूल असलेले पहावयास मिळते. सहकारी साखर कारखाने चांगल्या रितीने चालावेत, टिकावेत म्हणून शेतकऱ्यांच्या ऊसाच्या पैशाचा वापर करतात हे पाहून विद्यमान सरकारने अनुदान हे थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावे असे फर्मान काढले आहे. विधानसभेत जर आम्हाला मतदान केले नाही तर आम्ही पाणी आणि वीज बंद करू अशी धमकीही खुद्द अजित पवार यांनी निवडणूकीच्या वेळी दिली होती तर सहकारामध्ये केवळ आपल्याच भावकीतील लोकांची वर्णी सतत लावल्यामुळे हर्षवर्धन पाटील यांना विधानसभेत पराभवास सामोरे जावे लागले.

सहकारी संस्थामधील पदस्थाने केवळ आपल्याच मर्जीतील आणि नातेवाईक लोकांना देऊन त्यांना संतुष्ट ठेवण्याकडे सर्वच सरकार सम्राटांचा कल दिसतो याचा उपयोग विधानसभेच्या निवडणुकीसाठी करून घेण्याचा डाव सर्वच सम्राटांचा यशस्वीरित्या चालू राहिलेला दिसतो. परंतू अलिकडे सहकारी संस्था नव्याने सुरू होण्याचे प्रमाण घटलेले आहे. सत्ताधारी पक्षांच्या वळचणीला जाऊन लाभ घेण्यासाठी सहकारी संस्था प्रमुख एकमेकांमध्ये स्पर्धा करताना दिसतात. सहकार सम्राटांचा विरोधी गट क्रियाशील दिसत नाही केवळ निवडणुकांपुरते पॅनेल उभे करण्याचे काम करतात. आर्थिक गैरव्यवहाराचेही प्रमाण निवडणुकांमध्ये मोठया प्रमाणावर चालते मतदारही पॅनेल टू पॅनेल मतदान करताना पहावयास मिळतात. सहकारी संस्थांमधून विविध जातींमध्ये आरक्षणाच्या नावाखाली गटा–तटाचे राजकारण करून फूट पाडली जाते. अल्पसंख्याक, ओबीसी, भटके विमुक्त यांना खुल्या जागेवर संधी नाकारली जाते व सत्तास्थानी धुरीणत्व असलेली जात सतत व्यक्ती बदलून राहिलेली दिसते.

**संदर्भ सूची :**

१) जाधव तुकाराम, घोटाळे विवेक , महाराष्ट्राचे राजकारण नव्या वळणावर
२) पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास, सत्तासंघर्ष.
३) कायंदे गंगाधर, सहकार.
४) जिल्हा पातळीवरील राजकीय प्रक्रिया : पुणे जिल्हा एक अभ्यास बी. सी. यु. डी. लघुसंशोधन प्रकल्प.